दिनांक - २५ मे,२०१७

# टिपणी

## "राज्यातील आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पदक प्राप्त खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना रोख बक्षिस/पारितोषिक योजना प्रस्ताव सादर करणे"

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन,प्रचार,प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक असून याच भूमिकेतून राज्याचे क्रीडा धोरण,२०१२ घोषित करण्यात आले आहे. या क्रीडा धोरणानुसार आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक प्राप्त करणा-या खेळाडूंना तसेच त्यांचे क्रीडा मार्गदर्शक/प्रशिक्षक यांना रोख पारितोषिके देऊन गौरव करणेबाबतचा शासन निर्णय (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग -क्र. क्रीडाधो-२०१२/ प्र.क्र.१५८/ १२/क्रीयुसे-२. दि.५/२/२०१४) निर्गमित झाला असून सदर योजनेची अंमलबजावणी क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे स्तरावर करण्यात येते.

ऑलिम्पिक स्पर्धा, विश्व अजिंक्यपद स्पर्धा, एशियन गेम्स, राष्ट्रकुल स्पर्धा, युवा राष्ट्रकुल, एशियन चॅम्पियनशिप, युथ ऑलिम्पिक/ज्युनिअर एशियन/विश्व अजिंक्यपद स्पर्धा/शालेय आशियाई स्पर्धा, पॅरा आम्लिम्पिक स्पर्धा, पॅरा एशियन स्पर्धा इ.विविध अधिकृत आंतरराष्ट्रीय खेळांच्या अधिकृत संघटनाच्या वयोगटतील खेळाडूंनी प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाचे प्राविण्य प्राप्त केले असल्यास आपले खेळाचे प्रमाणपत्र तसेच संबधित राज्य/राष्ट्रीय खेळ संघटनाच्या शिफारसीसह रोख बक्षिस पारितोषिकासाठीचा विहित नमुन्यातील अर्ज परिपुर्ण भरून आवश्यक कागदपत्रासह संबधित जिल्हयाचे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत किंवा आयुक्त,क्रीडा व युवक सेवा, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे यांचेकडे सादर करण्याचे आवाहन डॉ.विजय झाडे, आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती करिता आपले जिल्हयाचे जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे कार्यालय किंवा क्रीडा व युवक सेवा, संचालनालय, शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे-बालेवाडी,पुणे येथिल कार्यालयाशी संपर्क करावा. (दुरध्वनी संपर्क -०२०-२७३९०३७१ विस्तारीत क्र.२१४)

(चंद्रकांत कांबळे)<br>
उपसंचालक,<br>
क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे



Scanned by CamScanner

## टिपणी

## "अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तसेच सहभागी झालेल्या होतकरू खेळाडूंना प्रशिक्षण व इतर बाबीसाठी आर्थिक सहाय्य करणे योजना प्रस्ताव सादर करणे"

राज्यात क्रीडा संस्कृतीची जोपासना व संवर्धन परिनामकारक करण्याच्या दृष्टीने तसेच राज्यातील खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करून पदक विजेते खेळाडू तयार व्हावेत यासाठी क्रीडा विषयक तंत्रशुध्द प्रशिक्षण, खेळाडुंच्या दर्जात सुधारणा, दर्जेदार पायाभुत सुविधा, खेळाडूंचा गौरव, क्रीडा प्रशिक्षकांना अद्यावत तंत्रज्ञानाची ओळख या बाबी विचारात घेवून क्रीडा धोरण २०१२ तयार करण्यात आले आहे. या अतंर्गत राज्यातील खेळाडूंना अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तसेच सहभागी झालेल्या महाराष्ट्रातील खेळाडूंना आर्थिक सहाय्य देणे बाबतचा शासन निर्णय क्रमांकः राक्रीधो-३११३/प्र.क्र.२९/क्रीयुसे-३/दि.२८ एप्रिल,२०१४ अन्वये पारीत झाला असून ही योजना क्रीडा व युवक सेवा,संचालनालय महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे स्तरावर कार्यान्वीत आहे. सदर शासन निर्णयातील अ.क्र.१ अन्वये नमुद १४ अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या खेळाडूंना खालील बाबींसाठी अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे.

(i) आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठीचा प्रवास खर्च, प्रवेश शुल्क, निवास,भोजन इ.

(ii) देश विदेशातील स्पर्धापूर्व प्रशिक्षण प्रशिक्षण उपकरणे, तज्ञ क्रीडा प्रशिक्षकांचे मार्गदर्शन शुल्क,प्रशिक्षण कार्यक्रम शुल्क.

(iii) आधुनिक क्रीडा साहीत्य आयात/खरेदी करणे,गणवेश इत्यादी.

**या योजनेसाठी पुढील स्पर्धा अधिकृत स्पर्धा म्हणून मान्यता दिली आहे.**

| | | |
|---|---|---|
| १) ऑलिम्पिक गेम्स | ६) एशियन चॅम्पियनशिप | ११) पॅरा एशियन स्पर्धा |
| २) विश्व अजिंक्यपद स्पर्धा | ७) युथ ऑलिम्पिक | १२) ज्युनियर एशियन चॅम्पियनशिप |
| ३) एशियन गेम्स | ८) ज्यु.विश्व अजिंक्यपद स्पर्धा | १३) एशियन कप |
| ४) राष्ट्रकुल स्पर्धा | ९) शालेय आशियाई/जागतिक स्पर्धा | १४) वर्ल्ड कप |
| ५) राष्ट्रकुल युवा स्पर्धा | १०) पॅरा ऑलिम्पिक स्पर्धा | |

Scanned by CamScanner

ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये ज्या खेळ /क्रीडा प्रकारांचा समावेश असेल तेच खेळ /क्रीडा प्रकार वरील नमुद इतर स्पर्धामध्ये आर्थिक सहाय्य मिळण्यास अनुज्ञेय होतील. मात्र अपवाद कबड्डी, खो-खो, मल्लखांब या देशी खेळांचा अपवाद उपरोक्त शासना निर्णयान्वये करण्यात आलेला आहे.

उपरोक्त विविध अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी किंवा सहभागी झालेल्या खेळाडूंना या योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज परिपुर्ण भरून आवश्यक कागदपत्रासह संबधित जिल्हयाचे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत किंवा आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे यांचेकडे सादर करण्याचे आवाहन डॉ.विजय झाडे,आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती करिता आपले जिल्हयाचे जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे कार्यालय किंवा क्रीडा व युवक सेवा, संचालनालय, शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे-बालेवाडी,पुणे येथिल कार्यालयाशी संपर्क करावा. (दुरध्वनी संपर्क -०२०-२७३९०३७१ विस्तारीत क्र.२१४)

स्थळप्रत मा.आयुक्त यांचे मान्यतेने

(सी.आर.कांबळे)

उपसंचालक,

क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे

Scanned by CamScanner